**M.A. (PART – I)**
**-: MARATHI :-**
***Study of Forms of Literature Stories (Rev)***
**(Paper – I) (June-2019)**

**e: 93903 / Marathi - Paper I- Sudy of Forms of Literature-Stories (Rev.)**

**(मराठी रुपांतर)**

**(३ तास)** **एकूण गुण : १००**

**सूचना : १) सर्व प्रश्न आवश्यक आहेत.**
**२) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.**

१. (अ) साहित्यप्रकारांच्या वर्गीकरणाची विविध तत्त्वे सांगून कथा या साहित्य प्रकाराचा स्वरूपविशेष सांगा.

**किंवा**

(आ) भारतीय आणि पाश्चात्य समीक्षकांनी सांगितलेली साहित्यप्रकारांच्या वर्गीकरणाची विविध तत्त्वे सांगा.

२. (अ) मनोविश्लेषण हा दिवाकरांच्या कथांचा अंगभूत विशेष आहे, दिवाकर कृष्णांच्या कथेतील पात्रचित्रणाच्या आधारे या विधानाची चर्चा करा.

**किंवा**

(आ) जी.ए. कुलकर्णी यांच्या कथामधील विविध आशयसूत्रांची वैशिष्ट्यपूर्णता साधार सांगा.

३. (अ) बदललेल्या ग्रामीण संस्कृतीचे चित्रण हा 'आलोक' या कथासंग्रहातील कथांचा गाभा आहे. या विधानाची चर्चा करा.

**किंवा**

(आ) गंगाधर गाडगीळ आणि बाबुराव बागूल यांच्या कथामधील पात्रांच्या समस्या भिन्न आहेत त्यामागे समाजाची विशिष्ट मानसिकता असलेली दिसते. या विधानाची चर्चा करा.

४. (अ) 'ढग' आणि 'आलोक' ह्या दोन्ही कथासंग्रहात ग्रामीण जीवनातील मूल्यसंस्कृती चित्रित झाली तरी त्यात काळानुसार झालेले भेद आहेत. या विधानाचा परामर्श द्या.

**किंवा**

(आ) विविध सामाजिक प्रश्नांची मांडणी कमल देसाई यांच्या कथामधून झाली आहे या विधानाची चर्चा करा.

५. (अ) गौरी देशपांडे यांची कथा आधुनिक स्त्रीवादी जाणिवांचे नवदर्शन घडविते या विधानाची चर्चा करा.

**किंवा**

(आ) पुढीलपैकी कोणत्याही **दोहोंवर** टिपा लिहा

(१) कथा आणि प्रवासवर्णन या कथनपर साहित्यप्रकारातील साम्यभेद

(२) बाबुराव बागूल यांच्या कथेतील सामाजिक वातावरण

(३) 'आलोक' कथासंग्रहातील भाषा

-------------------



86D0CC42D96BF93B0FBEE2A61D64EA9B

**M.A. (PART – I)**
**-: MARATHI :-**
***History of Marathi Literature (1874-1960)***
**(Paper – III) (June-2019)**

**ode: 93920 / Marathi - Paper III- History of Marathi Literature (1874-1960)**

(३ तास) एकूण गुण : १००

कोणतेही पाच प्रश्न सोडवा.
२) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

१. (अ) '१८७४ ते १९२० या कालखंडातील निबंध वाङ्मयाने आधुनिक मराठी गद्याचा पाया रचला' या विधानाचा सविस्तर आढावा घ्या.

**किंवा**

(ब) १८७४ ते १९६० या कालखंडातील साहित्य समीक्षा विचाराचा परामर्श घ्या.

२. (अ) १८७४ ते १९२० या कालखंडातील नाटकाच्या स्वरूप वैशिष्ट्यांचे सोदाहरण विवेचन करा.

**किंवा**

(ब) १८७४ ते १९२० या कालखंडातील विनोदी वाङ्मयाच्या स्वरूपाचा सोदाहरण आढावा घ्या.

३. (अ) हरिभाऊ आपटे आणि वा.म. जोशी यांच्या कांदबरी लेखनाचा आढावा घ्या.

**किंवा**

(ब) १९२० ते १९४० या कालखंडातील मराठी कवितेच्या वाटचालीचा आढावा घ्या.

४. (अ) १८७४ ते १९२० या कालखंडातील मराठी नाट्यसृष्टीच्या सामाजिक व राजकीय चित्रणाचा परामर्श घ्या.

**किंवा**

(ब) १८७४ ते १९२० या कालखंडातील मराठी कथा वाङ्मयाचा आढावा घ्या.

५. (अ) १९४० ते १९६० या कालखंडातील मराठी कवितेत आलेली विविधता साधार स्पष्ट करा.

**किंवा**

(ब) १८७४ ते १९६० या कालखंडातील ललितगद्याचा विकास कशाप्रकारे होत गेला ते साधार लिहा.

६. प्रत्येक गटातील एक टिपा लिहा

| **अ गट** | **ब गट** |
|---|---|
| (१) निबंधमाला | (१) अण्णासाहेब किर्लोस्कर |
| (२) संगीत शारदा | (२) नवकथाकार गंगाधर गाडगीळ |
| (३) करमणूक नियतकालिक | (३) वि.वा. शिरवाडकरांचे नाटकातील योगदान |
| (४) पण लक्षात कोण घेतो ? | (४) वि.स. खांडेकर |

-------------------



6BAA92287BB783ABBF9F4A5C6A4347FD

M.A. (PART – I)
-: MARATHI :-
Linguistic Study of
Marathi Language
(Paper – V) (June-2019)

Code: 93958 / Marathi - Paper V-Linguistic Study of Marathi Language

[वेळ: ३ तास] [ गुण:१००]

Please check whether you have got the right question paper.

सूचना: 1. प्रत्येक विभागातून किमान दोन प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.
2. एकूण पाच प्रश्न सोडवा.
3. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.
4. दोन्ही विभागाची उत्तरे एकाच उत्तरपत्रिकेत लिहा.

## विभाग १

१. ऐतिहासिक भाषाविज्ञान म्हणजे काय? ते सांगून ऐतिहासिक भाषाविज्ञानाची मुलतत्त्वे स्पष्ट करा.

२. मराठी भाषेची स्वनिमव्यवस्था स्पष्ट करून स्वनपरिवर्तनाचे प्रकार सोदाहरण स्पष्ट करा.

३. भाषिक आदानाची संकल्पना स्पष्ट करून भाषिक आदानाचे प्रकार सविस्तर स्पष्ट करा.

४. वैद्य गुणे वादाचे स्वरूप स्पष्ट करून मराठी भाषेच्या निर्मितीकाळाविषयीची चर्चा करा.

५. विवेचक टिपणे लिहा. **(कोणतेही दोन)**
   अ) भाषेच्या कालक्रमिक अभ्यासाचे महत्त्व
   ब) खंडात्मक स्वनिम व खंडाधिष्ठीत स्वनिम
   क) अर्थपरिवर्तनाची कारणे
   ड) पिजिन व क्रिओल भाषा
   इ) मध्यकालीन मराठीचे विशेष

## विभाग २

६. वर्णनात्मक भाषाभ्यास पद्धती म्हणजे काय? ते सांगून वर्णनात्मक भाषाभ्यास पद्धतीची वैशिष्टये साधार स्पष्ट करा.

७. स्वनपरिवर्तनाचे स्वरूप व कारणे सविस्तर स्पष्ट करा.

८. रुपिम - रूपिका - रुपिकांतर या संकल्पना समजावून देऊन रुपिकांतराचे प्रकार स्पष्ट करा.

९. प्रमाणभाषा आणि बोली यातील परस्परसंबंध स्पष्ट करून अहिराणी बोलीचे स्वरूप-विशेष साधार स्पष्ट करा.

१०. विवेचक टिपणे लिहा. **(कोणतीही दोन)**
   अ) सोस्यूरचा भाषाविषयक सिद्धांत
   ब) मानस्वर
   क) रुपिमांचे प्रकार
   ड) उच्चार व लेखन यातील अंतर
   इ) वऱ्हाडी बोली

*********

M.A. (PART – I)
-: MARATHI :-
Modern Marathi Prose &
Poetry (1960-Onwards)
(Paper – VII) (June-2019)

93976 / Marathi - Paper VII- Modern Marathi Prose & Poetry (1960-Onwards)

(३ तास) एकूण गुण : १००

कोणतेही पाच प्रश्न सोडवा.
सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

१. (अ) दिलीप पुरूषोत्तम चित्रे यांच्या ‘कविता’ या काव्यसंग्रहातील कवितांमधून आधुनिकतावादी जाणीव व्यक्त होते- विधान स्पष्ट करा.

**किंवा**

(ब) प्रेम आणि मृत्यू या दोन्ही जाणीवा ‘कविता’ या दि.पु. चित्रे यांच्या संग्रहामधून कशा व्यक्त झाल्या आहेत ते लिहा.

२. (अ) मानवी जीवनातील आदिम कामप्रेरणेची अभिव्यक्ती हा श्री. दा. पानवलकर यांच्या कथांमधील एक विशेष आहे हे ‘कमाई’ आणि ‘भूमी’ या कथांच्या संदर्भात सविस्तर लिहा

**किंवा**

(ब) श्री. दा. पानवलकरांच्या व्यक्तीमत्त्वाचे कोणकोणते पैलू त्यांच्या कथांमधून आढळून येतात हे साधार स्पष्ट करा.

३. (अ) ‘देवांसि जिवे मारिले’ ही कांदबरी विज्ञानयुगातील माणसाची आत्मकेंद्रित वृत्ती दाखविणारी ठरते या विधानाची सत्यता पारखा.

**किंवा**

(ब) ‘देवांसि जिवे मारिले’ या कांदबरीची विज्ञान कांदबरी म्हणून चिकित्सा करा.

४. (अ) आधुनिक राजकीय जीवनातील शोकात्मिका या नात्याने ‘सूर्यास्त’ या नाटकाचा परिचय करून द्या.

**किंवा**

(ब) ‘सूर्यास्त’ या नाटकात स्वार्थी राजकारण्यांनी चालवलेली लोकशाही मूल्यांची गळचेपी कशी चित्रित झाली आहे ते स्पष्ट करा.

५. (अ) ‘बिराड’ या आत्मकथनातून भटक्या-विमुक्त समाजाची जीवनशैली कशी साकार झाली आहे ते सांगा.

**किंवा**

(ब) ‘बिराड’ च्या निवेदकाच्या जीवन संघर्षाचे स्वरूप साधार लिहा.

६. टिपा लिहा (**कोणत्याही दोन**)

(अ) ‘एक सुनीत’ या कवितेच्या आशयाभिव्यक्तीचे वेगळेपण.

(ब) ‘चांदण’ या कथेतील अनुभवविश्व

(क) ‘देवांसि जिवे मारिले’ मधील डॉ. विद्याधर वाचस्पती

(ड) ‘सूर्यास्त’ शीर्षकाची अन्वर्थकता

(इ) ‘बिराड’ या आत्मकथनातील शोषणाचे चित्रण

-------------------



E770712B0FC9A97BA8F06DE54C025659